CR1989022807

घरबांधणी अग्रिम नियमांत विहित केलेल्या
अटींच्या अनुपालनाबद्दल.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक घबांअ-१०८६/(१०६०)/कोषागारे-६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ फेब्रुवारी १९८९.

## परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना
घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यानंतर, अग्रिम मंजूर करताना तत्संबंधीच्या आदेशांत विहित
केलेल्या अटींचे पालन केले जाते आहे किंवा नाही, तसेच घरबांधणी अग्रिमासंबंधीच्या त्या
त्या प्रकरणी लागू असलेल्या नियमांतील विहित इतर अटींची व शर्तींची पूर्तता होते किंवा
नाही याकडे कटाक्षाने लक्ष दिले जात नाही. यास्तव शासन असा आदेश देत आहे की,
ज्या प्रकरणी घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात आलेला आहे अशा प्रकरणी अग्रिमासाठी
मंजुरी देण्याबाबत काढलेल्या आदेशानुसार विहित केलेल्या अटी व शर्ती आणि मुंबई
वित्तीय नियम, १९५९ परिशिष्ट २६ मधील संबंधित इतर विहित अटी व शर्ती यांचे
पालन योग्य वेळी झाले आहे किंवा नाही याचे समाधान वेळीच करून घेण्याची जबाबदारी
घरबांधणी अग्रिम मंजूर करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याची राहील.

ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्याला घरबांधणी अग्रिम नियमांतील
एखादी अट शिथील करून अग्रिम मंजूर करण्यात येतो अशा प्रकरणी त्या विशिष्ट अटीतील
तरतुदीखेरीज इतर सर्व लागू असलेल्या विहित अटींची व शर्तींची पूर्तता योग्य वेळी होते
किंवा नाही याबाबत योग्य दक्षता घेण्याची जबाबदारी अग्रिम मंजूर करणाऱ्या सक्षम
अधिकाऱ्याची राहील. एखादी अट शिथील करून अग्रिम मंजूर करण्यात आला याचा
अर्थ असा नाही की, बाकी सर्व लागू होणाऱ्या/असणाऱ्या अटींची व शर्तींची पूर्तता
होते किंवा नाही हे पाहण्याची आवश्यकता नाही.

ज्या प्रकरणी विहित अटींची व शर्तींची पूर्तता योग्य वेळी होत नाही किंवा
झालेली नाही असे निदर्शनास आल्याबरोबर तात्काळ त्यासंबंधी काय उपाययोजना
करावी याबाबत वेळीच विचार करून पुढील निर्णय घेणे अत्यावश्यक असते. घरबांधणी
अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी या दृष्टीने योग्य ती काळजी/
खबरदारी वेळीच घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ग. रा. खातोरीकर,
शासनाचे उप सचिव.

(कृ. मा. प.

शासमु-रोटा-वित्त-एच-९११[९९८०]-२०-३-८९]